5594

# SHIVAJI UNIVERSITY,

## KOLHAPUR

Estd. 1962

# Board of Sports and Physical Education

## ≈ Inter-Zonal Merit Certificate ≈

Awarded to Shri/Smt. More Vivek Narayan Smita

of the Arts, Comm. & Sci. College, Gadhinglaj

being the Winner in Cross Country (M)

during 2021 -2022

Performance ..................................

Member Secretary
Board of Sports And Physical Education

President
Board of Sports And Physical Education

1 5 SEP 2022

सकाळ | कोल्हापूर
कोल्हापूर, मंगळवार, ८ फेब्रुवारी २०२२
TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

यजमान 'कला, वाणिज्य'ची मुसंडी

३

# यजमान 'कला, वाणिज्य'ची मुसंडी

## आंतरविभागीय क्रॉसकंट्री : महिलांत 'शिवराज' विजेता; रेश्मा कवठे, विवेक मोरे चमकले

गडहिंग्लज, ता. ७ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉसकंट्रीत पुरुष गटात येथील यजमान कला, वाणिज्य महाविद्यालयाने मुसंडी मारत विजेतेपद पटकावले. स्थानिक शिवराज महाविद्यालयाने महिला विभागात विजेतेपद, तर पुरुष विभागात उपविजेतेपद मिळविले. महिलांत सांगलीचे के.डब्ल्यू.सी. आणि पुरुषांत आजरा महाविद्यालय तृतीय स्थानावर राहिले. पुरुषांत 'कला, वाणिज्य'चा विवेक मोरे आणि महिलांत कौंगावच्या भोसले महाविद्यालयाच्या रेश्मा कवठेने पहिला क्रमांक मिळवून बाजी मारली. अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी या स्पर्धेतून संघाची निवड केली. स्पर्धेत १२९ धावपटू सहभागी झाले.



गडहिंग्लज : आंतरविभागीय क्रॉसकंट्रीतील सुरुवातीचा चढाओढीचा क्षण.

सकाळी ओमकार शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजन पेडणेकर यांच्या हस्ते क्रॉसकंट्रीला प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड अध्यक्षस्थानी होते. पुरुष गटात विजेतपदासाठी रस्सीखेच झाली. आर्टस, कॉमर्सचा विवेक पहिल्यापासून दमदारपणे धावत पहिल्या जथ्यात होता. शेवटच्या टप्प्यावर त्याने वेग वाढवित निर्णायक आघाडीद्वारे बिद्रीचा इंद्रजित फराकटे, आजऱ्याचा सिध्देश पुजारी याने मागे सारून विजेतेपद मिळवले. आष्टाचे आर्टस, कॉमर्स महाविद्यालय चौथे आले. महिलांत पारंपरिक शिवराज महाविद्यालयाच्या धावपटूंनी वर्चस्व राखले. पण, कौंगावच्या रेश्माने आत्मविश्वासपूर्ण घेतलेली आघाडी कायम ठेवत विजेतपदावर मोहोर उमटवली. शिवराजची प्राजक्ता शिंदे, कौंगावची यशस्विनी शिंदे यांना विजेतपदाने हुलकावणी दिली. 'कला, वाणिज्य'ची रोहिणी पाटील, मुरगूडची शिवानी कुलकर्णी, सांगलीची शुभांगी वाघमोडे यांना अनुक्रमे तिसरा, चौथा आणि पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले. महिलांत वारणानगरचे वाय. सी. महाविद्यालय चौथे राहिले. प्रकाश मंत्री, शुभम धुरे, गोपाळ जाधव, निवड समितीचे आर. टी. पाटील (कोवाड), जे. एच. मुल्ला (हुमरी), डॉ. सुरेश फराकटे, प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके दिली. स्पर्धा संयोजक सुरेश धुरे यांनी आभार मानले.

### अल्पोपाहार, भोजनाची सुविधा

संयोजक कला, वाणिज्य महाविद्यालयाने सहभागी धावपटूंच्या अल्पोपाहार आणि भोजनाची मोफत सुविधा दिली. लायन्स क्लबने पिण्याच्या पाण्याची सोय केली होती. याबद्दल धावपटूंनी समाधान व्यक्त केले.

प्रभारी प्राचार्य